**L. C. BILL No. X OF 2026.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

## सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १०.

## महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.

**(विधानपरिषदेने दिनांक २४ जून, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

२०१७ चा १० महा. ६.

२०२६ चा महा. अध्या. ६.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून त्यांनी दिनांक १६ जून २०२६ रोजी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२६, हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १६ जून २०२६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ याच्या कलम १०९ मधील,— २०१७ चा महा. ६.

(१) पोट-कलम (३) मध्ये,—

(एक) खंड (घ) मधील, दुसरे परंतुक वगळण्यात येईल;

(दोन) खंड (छ) मधील, विद्यमान दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, सन २०२६- २७ या शैक्षणिक वर्षासाठी, राज्य शासनास, ३० जून २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी अंतिम मान्यता देता येईल.";

(२) पोट-कलम (४) मध्ये, खंड (घ) मधील,—

(एक) दुसरे परंतुक व तक्ता वगळण्यात येईल;

(दोन) विद्यमान दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :-

"परंतु आणखी असे की, सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी, राज्य शासनास, ३० जून २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाईट केंद्रे सुरू करण्यासाठी परवानगी देता येईल.".

२०२६ चा महा. अध्या. ६.

सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२६, हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

(शा.म.मु.) एचबी ६१८–२ (४०५—६-२०२६)

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) याच्या कलम १०९ मध्ये, नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था किंवा नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकड्या किंवा सॅटेलाइट केंद्रे सुरू करण्याच्या कार्यपद्धतीची तरतूद केलेली आहे. उक्त कलम १०९ च्या पोट-कलम (३) च्या खंड (छ) मध्ये अशी तरतूद आहे की, राज्य शासनास, १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी अंतिम मान्यता देता येईल आणि उक्त कलम १०९ च्या पोट-कलम (४) च्या खंड (घ) मध्ये अशी तरतूद आहे की, राज्य शासनास, ज्या वर्षी परवानगी मागितली असेल, त्या वर्षाच्या १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाइट केंद्रे सुरू करण्यासाठी परवानगी देता येईल.

**२.** महाराष्ट्र विधान परिषदेच्या द्विवार्षिक निवडणुकीच्या आदर्श आचारसंहितेमुळे उक्त कलम १०९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत, नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था, सुरू करण्याची आणि नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा किंवा अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाइट केंद्रे सुरू करण्याची कार्यपद्धती पार पाडली जाऊ शकत नव्हती. म्हणून, उक्त कलम १०९ मध्ये सुयोग्य सुधारणा करून, सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी आणि नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाइट केंद्रे सुरू करण्यासाठी राज्य शासनाद्वारे अंतिम मान्यता किंवा परवानगी देण्याचा दिनांक वाढविणे इष्ट आहे, असे वाटले.

**३.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून त्यांनी दिनांक १६ जून २०२६ रोजी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२६ (२०२६ चा महा. अध्या. ६), हा प्रख्यापित केला होता.

**४.** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २२ जून, २०२६.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

## सन २०२६ चे वि.प.वि. क्र. १०.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट.

## (महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यातील उतारे)

## ( सन २०१७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६)

**१. ते १०८.** *** *** ***

**१०९.** (१) व (२) *** *** *** नवीन महाविद्यालय किंवा नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी सुरू करण्यासाठी परवानगी देण्याची कार्यपद्धती.

(३) (क) ते (ग) *** *** ***

(घ) विद्यापीठाने शिफारस केलेल्या अर्जांपैकी, राज्य शासनास, खंड (ग) अन्वये विद्यापीठाच्या शिफारशीनंतर, लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी इरादा पत्र देता येईल. इरादा पत्र मागणाऱ्या व्यवस्थापनाची योग्यता, उच्च शिक्षणाच्या परिसंस्थांच्या ठिकाणासंबंधातील राज्यस्तरीय अग्रक्रम इत्यादी प्रस्तुत घटक विचारात घेऊन, राज्य शासनास आपल्या निरपवाद स्वेच्छानिर्णयानुसार योग्य व उचित वाटेल त्याप्रमाणे अशा परिसंस्थाना इरादा पत्र देता येईल. राज्य शासनाकडून विद्यापीठाला, या खंडामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी इरादा पत्राविषयी कळविण्यात येईल :

परंतु, अपवादात्मक प्रकरणामध्ये व कारणे लेखी नमूद करून, उच्च शिक्षणाच्या महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला इरादा पत्र देण्यासाठी, विद्यापीठाने शिफारस न केलेल्या कोणत्याही अर्जास राज्य शासनाकडून मान्यता देता येईल :

" परंतु आणखी असे की, शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करिता राज्य शासनास, १५ मार्च २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी इरादा पत्र देता येईल.";

(ड़) व (च) * * * *** ***

(छ) खंड (च) खालील विद्यापीठाचा अहवाल विचारात घेतल्यानंतर, राज्य शासनाच्या अर्थसंकल्पीय तरतुदी, आणि इतर संबद्ध घटक, नवीन परिसंस्था चालू करण्याची परवानगी मागणाऱ्या व्यवस्थापनाची योग्यता इत्यादी लक्षात घेऊन, राज्य शासन आपल्या निरपवाद स्वेच्छानिर्णयानुसार, त्यास योग्य आणि उचित वाटेल त्याप्रमाणे अशा व्यवस्थापनास अंतिम मंजुरी देऊ शकेल. या खंडाखालील अंतिम मंजुरी ही, असे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था चालू करण्याच्या प्रस्तावित वर्षाच्या १५ जून रोजी किंवी त्यापूर्वी देण्यात येईल. अशी मान्यता राज्य शासनाकडून विद्यापीठाला कळविण्यात येईल. त्यानंतर दिलेल्या मान्यता ह्या, विद्यापीठाकडून केवळ त्यानंतरच्या शैक्षणिक वर्षातच अंमलात आणल्या जातील:

परंतु, तसेच अपवादात्मक प्रकरणांमध्ये आणि कारणे लेखी नमूद करून, राज्य शासनास, विद्यापीठाने शिफारस न केलेल्या कोणत्याही अनुपालन अहवालास मान्यता देता येईल.

(४) (क) ते (ग) *** *** ***

(घ) विद्यापीठाने शिफारस केलेल्या अर्जांपैकी, राज्य शासनास, इतर संबद्ध घटक, राज्य शासनाची अर्थसंकल्पीय तरतूद, इतर संबद्ध घटक, परवानगी मागणाऱ्या व्यवस्थापनाची योग्यता, इत्यादी बाबी विचारात घेऊन, त्याच्या पूर्ण विवेकानुसार त्याला योग्य व उचित वाटतील अशा परिसंस्थांना त्या वर्षाच्या १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी परवानगी देता येईल :

परंतु असे असले तरी, अपवादात्मक प्रकरणांमध्ये आणि विद्यापीठाने शिफारस न केलेल्या कोणत्याही अर्जाच्या बाबतीत, राज्य शासनास, कारणं लेखी नमूद करून मान्यता देता येईल.

“ परंतु आणखी असे की, २०२४- २५ या शैक्षणिक वर्षासाठी राज्य शासनांकडून परवानगी देण्याचा दिनांक वाढवण्यासाठी, खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ ( २ ) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम ( ४ ) च्या खंड (घ) मध्ये निर्दिष्ट केलेला दिनांक हा, उक्त तक्त्याच्या स्तंभ ( ३ ) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वाचण्यात येईल :-

**तक्ता**

| खंड | विद्यमान तरतुदीमध्ये तरतूद केलेला दिनांक | २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी तरतूद केलेला दिनांक |
|---|---|---|
| ( १ ) | ( २ ) | ( ३ ) |
| (घ) | ज्या वर्षी परवानगी मागितली असेल त्या वर्षाच्या १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी. | १५ जुलै २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी.”. |

( ५ ) ते ( ९ ) *** *** ***

**११०.** ते **१४८.** *** *** ***

**अनुसूची.** *** *** ***

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १०.]**

**[महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६
यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.**]**

**[ विधानपरिषदेने दिनांक २४ जून, २०२६ रोजी
संमत केल्याप्रमाणे.]**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव ( ३ ),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.